महासागर मंगळवार २१ऑक्टोंबर २०२५

भंडारा


## खास दिवाळीच्या शुभ पर्वावर पवनी शहरात प्रथमच दीपोत्सव स्पर्धा

### भव्य दीपोत्सव स्पर्धा २०२५

**महासागर प्रतिनिधी**

**पवनी :** पवनी शहरातील गणेश उत्सव मंडळ ,दुर्गा उत्सव मंडळ व मंदिर समिती सोबतच इच्छुकांनी सहभाग घेऊन प्रथमच पवनी शहरात प्रत्येक मुख्य चौकात दीप उत्साहात साजरा व्हावा पवनी शहराची या महोत्सवाच्या निमित्ताने एक वेगळी ओळख निर्माण व्हावी यासाठी प्रत्येकाने या उत्सवात भाग घ्यावा,

शहरातील मुख्य चौका चौकात दीपोत्सव साजरा व्हावा उद्देश दीपोत्सवात रांगोळी काढताना कुठल्याही एका थीमवर रांगोळी काढणे अनिवार्य राहील सोबत फुलांच्या पाकळ्यांची सजावट सुद्धा विशेष आकर्षण म्हणून देऊ शकता

स्पर्धेत एकुण ११ बक्षिस आहेत दीपोत्सवातील फोटो व व्हिडिओ एक हात मदतीच्या ग्रुप वर शेअर करावे ते सर्व एक हात मदतीच्या ग्रुपची मंडळी चेक करून स्पर्धेतील बक्षीस घोषित करणार. कृपया आपणही दिवाळीच्या शुभ पर्वावर एक दिवा लावत या महोत्सवाचा उत्साह वाढवावा असे आयोजकांनी केले आहे.

## डोकेदुखीचा त्रासमुळे महिलेनी केली गळफास घेवुन आत्महत्या

**अडयाळ दि. :** पो.स्टे. अडयाळ अंतर्गत की, यातील मृतक श्रीमती मंगला एकनाथ चिचमलकर वय ४७ वर्षे रा. भावड ता. पवनी जि. भंडारा हिला डोकेदुखीचा त्रास असल्याने ति मामाकडे राहत होती. यातील मृतक ही दि १३/०९/२०२५ रोजी घरी एकटीच हजर होती. तक्रारदार हे कामावर गेले होते घरी परत आल्यानंतर त्यांना बेडरूमचे दार बंद दिसल्याने आवाज दिला असता आवाज न आल्याने दार तोडले असता यातील मृतक हीने सिलींग फॅनला तिचे ओढणीने गळफास घेवुन मरण पावल्याचे दिसले असे अर्जदाराचे तोंडी रिपोर्ट वरून व वैद्यकीय मेमो वरून, ठाणेदार यांचे आदेशाने पो स्टे अडयाळ येथे मर्ग क्रमांकः - २९/२०२५ कलम १९४ बि.एन.एस.एस. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला.

# बिना नंबर प्लेट ट्रॅक्टरचा महापूर

### उपसभापती बोरकर यांनी केली कारवाई मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा :** सिहोरा परिसरात व पोलीस स्टेशन सिहोराच्या हद्दीत असलेल्या विविध रेती घाटावर अवैद्यरित्या रेतीची वाहतूक सुरू आहे. यात बिना नंबर प्लेट चे ट्रॅक्टर भरधाव वेगाने रस्त्यावर धावत आहेत. यांच्यावर महसूल विभाग व पोलीस प्रशासनाने प्रतिबंधात्मक कारवाई करावी, अशी मागणी तुमसर पंचायत समितीचे उपसभापती सुभाष बोरकर यांनी एका प्रसिद्धी पत्रका अन्वय संबंधित विभागांना केली आहे.

उपविभागीय अधिकारी उपविभाग तुमसर, तहसीलदार तुमसर व पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन सिहोरा यांना दिलेल्या निवेदनातून वारपिंडकेपार, महालगाव, सोंड्या, देवसर्री व इतर रेती घाटावर सुद्धा अवैधरित्या रेतीची वाहतूक धडाक्यात सुरू आहे. यात बिना क्रमांकाच्या ट्रॅक्टर व ट्रॉली चा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जात आहे. अवैद्य रित्या रेतीची वाहतूक करण्याची ठराविक वेळ रात्री बारा ते सकाळी सहा वाजेपर्यंत वाळूमाफियांनी आखली आहे. आपला ट्रॅक्टर महसूल विभागाच्या किंवा पोलीस प्रशासनाच्या अधिकाऱ्याला पकडता येणार नाही हा उद्देश ठेवून ट्रॅक्टर चालक-मालक अति जलद वेगाने ट्रॅक्टर भरधाव वेगाने पळवून नेतात. यात अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकीकडे शासन पर्यावरण रक्षणासाठी मोहिमा राबवत असताना, दुसरीकडे रेती घाटांवर परिसरात उघडपणे सुरू असलेल्या या अवैध उपशामुळे नदीपात्राचे अस्तित्व धोक्यात आले आहे. याचा परिणाम स्थानिक भूजलस्तरावरही होण्याची शक्यता आहे.

याबाबत नागरिकांनी अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार केली असली तरी, स्थानिक सरपंच, पोलिस पाटील तसेच पोलिस व महसूल प्रशासन यांच्याकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. उलटपक्षी, गावात चर्चा आहे की हे अधिकारी रेती तस्करांकडून आर्थिक लाभ घेऊन मौन बाळगतात. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी सूर आहे. घरकुल बांधकामाच्या नावाखाली अवैध रेतीचा उपसा धडाक्यात सुरू आहे. घरकुल बांधकामासाठी रेतीची वाहतूक होत असेल तर रात्रीला अवैधरीत्या रेती उपसा का करण्यात येत आहे. म्हणजेच ही रेतीची वाहतूक अधिकृत नसून अनधिकृत असल्याचे तसेच अति जलद गतीने धावणाऱ्या बिना नंबर प्लेटच्या ट्रॅक्टर ट्रॉलीने अपघात झाल्यास याला जबाबदार कोण असेही पंचायत समितीचे उपसभापती सुभाष बोरकर यांनी म्हटले आहे.

**गावकऱ्यांचा इशारा :-** 'महसूल प्रशासन आणि पोलिस विभाग यांनी तातडीने रेती उपसा थांबवावा, संबंधित बिना नंबरच्या ट्रॅक्टर ट्रॉली जप्त करावेत आणि या तस्करीमागील प्रमुख माफियांवर कठोर कारवाई करावी. या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले गेले, तर ग्रामवाशीयांकडून पोलिस स्टेशनसमोर मोर्चा काढून आंदोलन करण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.'

## तावशी शिवारात वन्यप्राण्यांचा धुमाकूळ!

### हातातोंडाशी आलेले पीक फस्त, शेतकरी हवालदिल

**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर :** तालुक्यातील तावशी परिसरात गेल्या काही दिवसांपासून रानडुक्कर, रोही आणि इतर जंगली प्राण्यांचा उपद्रव वाढला असून, यामुळे शेतशिवारातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने उभे केलेले आणि आता कापणीला आलेले पीक या वन्यप्राण्यांनी फस्त केल्याने बळीराजाचे अतोनात नुकसान झाले आहे.

**धान व भाजीपाल्याचे नुकसान**

मिळालेल्या माहितीनुसार, तावशी आणि लगतच्या शिवारात रात्रीच्या वेळी जंगली प्राण्यांचे कळप शेतात घुसतात. त्यांनी प्रामुख्याने धान आणि भाजीपाला पिकांचे प्रचंड नुकसान केले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील उभे पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. हे नुकसान इतके मोठे आहे की, शेतकऱ्यांचा लागवडीचा खर्चही निघणे आता कठीण झाले आहे.

**शेतकरी रात्रंदिवस जागूनही उपयोग नाही**

या वाढत्या उपद्रवामुळे शेतकरी रात्रंदिवस शेतात जागून पिकांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करत आहेत. थंडीवाऱ्याची पर्वा न करता शेतकरी जागी असले तरी, वन्यप्राण्यांचे कळप मोठे असल्याने त्यांचा प्रतिकार करणे शेतकऱ्यांना शक्य होत नाही. 'दिवसभर शेतात काम करायचं आणि रात्री पिकांची राखण करायची, पण तरीही ही जनावरे हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेत आहेत,' अशी खंत एका नुकसानग्रस्त शेतकऱ्याने व्यक्त केली.

**वनविभागाने तातडीने लक्ष देण्याची मागणी**

गावकरी आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी वनविभागाकडे या समस्येवर तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली आहे. वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी ठोस उपाययोजना करावी आणि झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून शेतकऱ्यांना त्वरित नुकसानभरपाई मिळावी,

अशी मागणी जोर धरू लागली आहे. या गंभीर नुकसानीमुळे तावशी परिसरातील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. वनविभागाने याकडे लक्ष देऊन शेतकऱ्यांना लवकरात लवकर दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## प्रा. भुरे यांच्या 'माझे जीवनदर्शन', 'राजधर्म दर्शन' ग्रंथांचे प्रकाशन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि. २० ऑक्टोंबर :** विदर्भ साहित्य संघ शाखा भंडारा व सार्वजनिक भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने भंडारा येथील साहित्यिक प्रा.नरेंद्र भुरे यांच्या 'माझे जीवनदर्शन'व 'राजधर्म दर्शन'या ग्रंथांचा प्रकाशन सोहळा थाटात पार पडला.

सार्वजनिक वाचनालय भंडाऱ्याच्या इंद्राराज सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे कार्यवाह प्रा.सुमंत देशपांडे हे होते.याप्रसंगी सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय दलाल,नागपुरचे ज्येष्ठ साहित्यिक डॉ.ईश्वर नंदपुरे, आकोटचे सरपंच विजयभाऊ भुरे, लेखक प्रा.नरेंद्र भुरे,सौ नंदिनी भुरे आदी मान्यवर उपस्थित होते.



प्रा.नरेंद्र भुरे यांच्या ग्रंथाचे प्रकाशन करतांना मान्यवर

नरेंद्र भुरे यांच्या 'माझे जीवनदर्शन'व 'राजधर्म दर्शन'या ग्रंथाचे प्रकाशन डॉ.ईश्वर नंदपुरे यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. नंदपुरे यांनी प्रा.भुरे यांचे दोन्ही ग्रंथ हे वाचनीय असून त्यांच्या हातून पुढेही साहित्य सेवा घडावी अशी अपेक्षा व्यक्त केली.डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे यांनी 'माझे जीवनदर्शन'या ग्रंथावर भाष्य करतांना प्रा. भुरे यांनी त्याच्या या ग्रंथातून शांत व नितळ जीवनाचे दर्शन घडविल्याचे सांगितले.लेखक नरेंद्र भुरे यांनी आपल्या मनोगतातून अनेकांच्या आशीर्वादातून ही साहित्य सेवा घडल्याचे सांगितले.अध्यक्षीय भाषणातून प्रा.सुमंत देशपांडे यांनी राजधर्म दर्शन हा ग्रंथ अत्यंत अभ्यासूवृत्तीतून साकार झाल्याचे सांगून प्रा.भुरे यांनी पु.ग.सहस्त्रबुद्धे यांच्या साहित्य समीक्षेला यथोचित न्याय दिल्याचे सांगितले.याप्रसंगी आकोटचे सरपंच विजयभाऊ भुरे, व्यंकटेश शब्दे यांनी मनोगत व्यक्त केले. मुंबईचे वस्त्रोद्योग आयुक्त डॉ.सर्वेश्वर भुरे यांचा शुभेच्छा संदेश वाचून दाखविण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्रा.नरेश आंबिलकर यांनी केले आभार प्रा. प्रेमलाल लांजेवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुधाकर बिलवणे,श्रीकृष्ण हटवार,सौ.प्रियंका बिलवणे, अशोक भुरे, जनार्दन भुरे, श्रीकृष्ण देशमुख, बोरघरे, सौ.शुभदा पाखमोडे यांनी परिश्रम घेतले.

## नवजीवनचा मयूर मैदानी स्पर्धेत राज्यस्तरावर




**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि. १९ ऑक्टोंबर :** क्रीडा परिषद पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय चंद्रपूर, यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल चंद्रपूर येथे आयोजित विभागस्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत नवजीवन विद्यालय अँड ज्युनिअर सायन्स कॉलेज, जमनापूर/साकोली येथील विद्यार्थ्यांचे मैदानी स्पर्धेत यश संपादन केले.

यात १७ वर्षे वयोगटात मुलांमध्ये मयुर चांदेवार थाळी फेक प्रथम क्रमांक व गोळा फेक प्रथम क्रमांक पटकाविला. या खेळाडूंची आता राज्यस्तरीय गोळा फेक व थाळी फेक स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

त्यांच्या या यशासाठी शाळेचे मुख्याध्यापक डॉ. लोकानंद नवखरे, क्रीडा शिक्षक मुरलीधर घोरमारे, अमोल वाकडे व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विजयी खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन केले.

# सेंदूरवाफा सार्वजनिक शौचालय स्वच्छ करा

### राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे मुख्याधिकारी यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि. १९ ऑक्टोंबर :** सेंदूरवाफा येथील लवारी उमरी रोड वरील न. प. च्या हद्दीतील सार्वजनिक शौचालय मधील शौचालयाचे गटर हे पूर्णपणे भरलेले असल्यामुळे तेथील नागरिक शौचालयात जात नाही तसेच तिथल्या दुर्गंधीमुळे इतरत्र जात असतात.



काही सेंदूरवाफा मधील काही नागरिकांनी याबद्दल माझ्याकडे तक्रार केली की, इथले शौचालयचे गटर हे दुर्गंधी मुक्त आणि खाली करण्यात यावे व नियमित साफसफाई ठेवून स्वच्छता राखवी याकरिता, यावर लवकरात लवकर कार्यवाही करून तेथील शौचालयचे गटर रिकाम करून त्यांना व्यवस्थित करण्यात यावे या करिता नगरपरिषद ला निवेदन दिले.

आणि लगेच नगरपरिषद साकोली सेंदूरवाफा चे मुख्याधिकारी मंगेश वासेकर यांनी आदेश देऊन मशीन पाठवून काम सुरु झाले.

याप्रसंगी उपस्थित महिला राष्ट्रवादीच्या तालुका अध्यक्ष सौ. जयाताई भुरे,नगरध्यक्ष महिला पदाच्या भावी उमेदवार सौ. प्रीती भांडारकर,सौ. शिलादेवी वासनिक,सौ. सुरेखा शहारे,सौ. लक्ष्मीकांता डबरे,ज्योतीताई कानेकर,सौ. सविताताई शहारे, शहर राष्ट्रवादी चे सर्वश्री नरेशजी भुरे,राजूभाऊ हटवार,प्रभाकरजी सपाटे,प्रशांत राऊत,रवीभाऊ माकोडे,निखिलजी जीभकाटे, धनंजयजी शहारे,विशाल मेश्राम,निखिल नेवारे,पिंटू शेंडे आदी उपस्थित होते.

## पलक बावनकुळे शालेय राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि. १९ ऑक्टोंबर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय शालेय धनुर्विद्या स्पर्धा दि. १६ ते १७ ऑक्टोबर २०२५ ला पायलट आर्चरी सेंटर गडचिरोली येथे पार पडली.

सदर स्पर्धेत १७ वर्ष गट मुली कंपाऊंड राऊंड या प्रकारात नवजीवन इंग्लिश स्कूल साकोली ची धनुर्धर पलक संदिप बावनकुळे हिने तृतीय क्रमांक पटकावून विभागीय टीम मध्ये आपले नाव समाविष्ट केले.

नोव्हेंबर २०२५ मध्ये वाशिम येथे पार पाडणाऱ्या शालेय राज्यस्तरीय स्पर्धेत पलक नागपूर विभागाचे नेतृत्व करेल तीच्या यशाबद्दल अमेचुर आर्चरी असो. भंडारा चे अध्यक्ष नईम कुरेशी, उपाध्यक्ष डॉ रमेश दृगकर, सहसचिव,क्रीडा संघटक शाहेद कुरेशी , सचिव रविकुमार रंगारी, समस्त पालक वर्ग यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## यशोदाबाई एकनाथ लांजेवार यांचे निधन



**गोंडउमरी :** निलज येथील यशोदाबाई एकनाथ लांजेवार ता. साकोली .जि भंडारा वय ७० वर्ष हृदय झटक्यांनी निधन झाले .आज दि. १०/१०/२०२५ ला अंत्यसंस्कार करण्यात आले . त्याच्या पश्चात दोन मुले व नातवंडं असुन बराच मोठा आप्त परिवार आहे .

# तामसवाडी शाळेत दामिनी पथकाचे मार्गदर्शन




**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा दि. २० ऑक्टोंबर :** हरदोली केंद्रातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तामसवाडी येथे दामिनी पथकाने भेट देऊन मार्गदर्शन केले.

भंडारा जिल्हा दामिनी पथकातील सुभाष मस्के, महिला पोलीस ममताज शेख यांनी जि.प.उच्च प्राथमिक शाळा तामसवाडीच्या विद्यार्थ्यांना महिला सुरक्षितता, किशोरवयीन मुलींची सुरक्षितता, सुरक्षित स्पर्श, असुरक्षित स्पर्श व भरोसा सेल याबाबतची सविस्तर माहिती सांगितली. मस्के यांनी सायबर गुन्हे, लहान मुलांना पळवून नेणे याबाबत उदाहरणे देऊन माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे संयोजन मुख्याध्यापक पटले यांच्या नेतृत्वात करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका किरण बडवाईक यांनी केले आभार विलास गोरे यांनी मानले.

याप्रसंगी नवले, शितल बनकर, श्रुती मारबते उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सानिया बनकर,मोनाली मासुरकर, रुची ईखार,मुस्कान बनकर,शिवम ठाकरे, वेदांश गोंडाणे,उर्वशी काटवले, अवनी भोयर,निधी बनकर यांनी अथक परिश्रम घेतले.



